# जीवन विकास प्रतिष्ठान, लातूर

दिनांक ०५/०८/२०१७

## सर्वसाधारण सभा सूचना

संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना या सूचनेद्वारा जाहीर करण्यात येते की, जीवन विकास प्रतिष्ठान, लातूर या संस्थेची सर्वसाधारण सभा दि. २२/८/२०१७ मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.३० वा. जीवन विकास प्रतिष्ठान सभागृह, मतिमंद विद्यालय, एम.आय.डी.सी, लातूर येथे संस्थाध्यक्ष मा.श्री.जयसिंहरावजी देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

तरी, सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

## सर्वसाधारण सभे पुढील विषय

१. मागील सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून मंजूर करणे.
२. मार्च २०१६–१७ पर्यंतच्या अहवालाचे वाचन व मान्यता.
३. आय–व्यय विवरणपत्र व ताळेबंद पत्रकाचे वाचन करुन ऑडीट रिपोर्टला मान्यता देणे.
४. सन २०१७–१८ वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५. संस्थेच्या हिशोब तपासणीसाठी ऑडीटरची व विधी सल्लागाराची नियुक्ती करणे
६. आगामी पाच वर्षासाठी विश्वस्त व कार्यकारी मंडळाची निवड करणे.
७. मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित विषयावर चर्चा/निर्णय.

दिनांक :– २२ ऑगस्ट २०१७ मंगळवार
वेळ :– सकाळी १०.३० वा.
स्थळ :– जीवन विकास प्रतिष्ठान सभागृह
मतिमंद विद्यालय,
एम.आय.डी.सी, लातूर

जीवन विकास प्रतिष्ठान, लातूर
रजि. नं. एफ-393
लातूर

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

(ग्रामानुज रांदड)
सचिव
जीवन विकास प्रतिष्ठान, लातूर

विशेष सूचना :–

१. गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास ही सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरविली जाईल. त्यावेळी गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. संस्थेच्या कामकाजाविषयी कांही प्रश्न विचारावयाचे असल्यास कृपया ते लेखी स्वरुपात दि. १५/८/२०१७ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात सादर करावेत. उशीरा आलेल्या सूचनांचा ऐनवेळी विचार केला जाणार नाही.
३. व्यवसाय प्रतिष्ठान, संस्था सदस्यांनी आपले प्रतिनिधी अभिकृत पत्रासह पाठवावा.
४. कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत संस्थेचे हिशोब पाहण्यासाठी उपलब्ध रहील.

कार्यालय :– जीवन विकास प्रतिष्ठान,द्वारा मूकबधीर विद्यालय, प्लॉट क्र.पी–४२, कळंब रोड, एम.आय.डी.सी, लातूर.
दूरध्वनी :– २२१२१४

(निमंत्रण – सभेनंतर स्नेहभोजन आयोजित केले आहे. अवश्य लाभा घ्यावा.)